## १०६ सदनिकांसह ७ दुकानांचा समावेश

# दोनापावला येथे प्रेस्टीज ग्रुपचा भव्य 'ओशन क्रेस्ट' प्रकल्प

पणजी

प्रेस्टीज ग्रुप हा भारतातील आघाडीचा विकासक आणि बिल्डर्स ग्रुप आहे. प्रेस्टीज समूहाने आज दोनपावला येथील त्यांच्या पहिल्यावहिल्या निवासी विकास प्रकल्पाची घोषणा केली. 'प्रेस्टीज ओशन क्रेस्ट' (रेरा क्रमांक : पीआरजी०२२०१०७३) या नावाने हा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून प्रेस्टीज ग्रुपने गोव्यात दमदार पदार्पण केले आहे. या प्रकल्पात प्रेस्टीज ग्रुप यांची मथायस कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांच्यासोबत भागीदारी आहे.

दोनापावला येथे साकारणारा 'प्रेस्टीज ओशन क्रेस्ट' हा प्रकल्प भव्य असून या प्रकल्पात १०६ निवासी सदनिका उपलब्ध असणार आहेत. या शिवाय ७ दुकानांसाठी जागा उपलब्ध असणार आहे. या प्रकल्पाचे खास वैशिष्ट्य म्हणजे येथील सर्व सदनिकांमधून समुद्राचे दर्शन होणार आहे.

तसेच या प्रकल्पात गार्डनची निर्मिती करण्यात येणार असून पाचव्या मजल्यावर उपाहारगृह असणार आहे. या उपाहारगृहातून ग्राहकांना समुद्राचे सुंदर रूप न्याहाळता येणार आहे. सातव्या मजल्यावर क्लब हाऊस असणार आहे. जेथे टेबल टेनिस रूम, इनडोअर गेम्स रूम, पार्टी हॉल, पार्टी डेक, स्विमिंग पूल आणि पूल डेक, महिला आणि पुरुषांसाठी टॉयलेट ब्लॉक, जिम आणि योगा डेक यांचाही समावेश असल्याचे प्रेस्टीज ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक इरफान रझाक यांनी सांगितले. दरम्यान, प्रेस्टीज ग्रुपची स्थापना ही १९८६ मध्ये झाली असून ते भारतातील एकमे[व] क्रिसिल डीए१ डेव्हलपर आहेत.